जा.क्र.विशा/राजकीय/ /२०२६
विशेष शाखा,पिंपरी चिंचवड
दिनांक :- /१०/२०२६
२९

**आदेश,**

**विषय :- भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS)- २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश**

ज्याअर्थी, मा.भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र.ECI/PN/118/2026 dt.22.09.2026 रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये विधान परिषद - २०२६ शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणुका- २०२६ चा निवडणुक कार्यक्रम घोषित केले असून दि.२३.१०.२०२६ रोजी मतदान व दिनांक २७.१०.२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. –पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात येणारे पोलीस स्टेशन चिंचवड पोलीस ठाणे (मतदान केंद्र-३ बुथ-६) सांगवी पो स्टेशन (मतदान केंद्र-२ बुथ-४) बावधन पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-२), हिंजवडी पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-५), दिघी पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-२), उत्तर चाकण पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-२), भोसरी पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-४), भोसरी एमआयडीसी पो.ठाणे (मतदान केंद्र-१ बुथ-४), उत्तर म्हाळुंगे पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-२), तळेगांव दाभाडे पो.ठाणे (मतदान केंद्र-२ बुथ-४), या पोलीस ठाण्याचे हदीमध्ये एकुण २० मतदार केंद्र व ३५ बूथचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात एकुण २० मतदान केंद्र व ३५ बुथवर मतदान होणार आहे.मतदान सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचु नये व सार्वजनिक शांतता बिघडु नये यासाठी सदर मतदार संघाचे परिघापासुन १०० मिटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणासाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने मतदार केंद्र व बुथ पासुन १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड मला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS) चे कलम- १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निवडणूक होणा-या कार्यक्षेत्रात दिनांक २३.१०.२०२६ रोजी रात्री ००.०१ वा. पासुन ते मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१) विधानपरिषद शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणूक २०२६ च्या पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदार संघात एकुण २० मतदार केंद्र व ३५ बुथवर मतदान होणार आहे. परिघापासुन १०० मिटर सभोतालच्या परिसराच्या आतील सर्व व्यवसायीक दुकाने,रेस्टॉरंन्ट,टप-या, आस्थापना(अत्यावश्यक सेवा वगळुन ) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवावेत.

२) मतदान केंद्र व परिसरात आतील भागात कोणत्याही प्रकारचे हत्यार, अग्निशस्त्रे जवळ बाळगता येणार नाहीत सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय अंमलदाराला (पोलीस दल, संरक्षण दल ,तुरंग विभाग, बँक संरक्षण विभाग व इतर केंद्रीय राज्य शासनाच्या अधिकारी व अंमलदार यांना ) लागु राहणार नाही.

३) मतदान केंद्रे व परिसरात मोबाईल फोन,लॅपटॉप व इतर ईलेकट्रॉनीक यंत्रे वापरण्यास अगर घेवुन येण्यास मनाई करण्यात येत आहे.(कर्तव्यावर असणा-या अधिकारी /अंमलदार यांना हा आदेश लागु राहणार नाही.)

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्तीस भारतीय न्याय संहिता (BNS)- २०२३ चे क.२२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्कयानिशी आज दि.२९/१०/२०२६ रोजी दिला आहे.

सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :-२९ .१०.२०२६

(डॉ.शशिकांत महावरकर)
पोलीस सह आयुक्त,पिंपरी- चिंचवड.

**प्रत सविनय सादर :-**

१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई.
२. मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३. मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४. मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
५. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

**प्रत :- सस्नेह अग्रेषीत :-**

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. मा.आयुक्त म.न.पा.पुणे / पिंपरी चिंचवड म.न.पा.पुणे
३. मा.जिल्हा सत्र न्यायधिश, पुणे
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
५. मा.सर्व निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रत :-**

१. सर्व पोलीस उप आयुक्त, / सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे.
२/- या आदेशाचे स्थापनिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.

२. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे.
२/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर.